# प्रतिक्रीया

प्रकाशित:

**रत्नाकर वाणी**

पुनरारंभ

© **पुनरारंभ**

**website:** http://www.rajratna.co.in **Email:** ratnakar.wani@rajratna.co.in

# प्रतिक्रीया

एका दैनिकामध्ये तरूणीवर ओढवलेला बिकट प्रसंग वाचण्यात आला. एक तरूणी पाश्चिमात्य गोष्टीचे अनुकरण करित एका तरूणाबरोबर लिव्ह इन रिलेशनशिप मध्ये काही वर्षे सहवासात होती पण काही करणास्तव आपसातील मतभेदांमुळे त्या तरूणाने तिचा त्याग केला. तिच्यावर अत्याचार केलेत. तिला एकाकी सोडून दिले. तिच्यावर बिकट प्रसंग ओढवला. तिच्या कडून झालेल्या चुकिबद्दल तिला आता वाईट वाटत होते. या मुद्दयास धरून तरूणीची व्यथा व त्यावरील समुदेशकाराने केलेले समुपदेशन पण वाचण्यात आले. त्या तरूणीवर ओढवलेल्या बिकट प्रसंगाबद्दल तिच्या प्रती पूर्ण सहानुभुती आहे. तिला या प्रसंगातून लवकरात लवकर योग्य मार्ग मिळो  व तिचे उर्वरित जिवन सुखा समाधानाचे जावो. हीच सदिच्छा. असे प्रसंग समुपदेशाने लवकर सुटतील अशी अपेक्षा. समुपदेशन झाले खरे, परंतु या पेक्षा त्या तरूणीवर हा प्रसंग का ओढवला व कसा ओढवला याचा विचार करणे देखिल तितकेच महत्वाचे ठरेल.

आजकालची तरूण पीढी सुशिक्षित व प्रगल्भ विचाराची व त्या अनुषंगाने आधुनिकतेचा विचार करीत अशा काही बेजवाबदार घटना त्यांच्या कडून होत असतात. यामध्ये त्यांच्या व्यतिरिक्त पालकांकडून होणारे दुर्लक्ष, म्हणून काही अंशी पालक देखिल कारणीभूत आहेत असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

प्रेम हे पवित्र मानले जाते. ते हृदयातून पाझरावे लागते. मनाने स्विकारून मनापासून केलेले असावे. ज्यावेळी दोन व्यक्ती एकत्र येतात त्यांची मने, आचार, विचार जुळतात. त्यावेळी आपोआप एकमेकाबद्दल प्रेम व सहानुभुति निर्माण होते. अशावेळेला त्याच्यावर प्रेम करा असे कोणास सांगावयाची गरज नाही. यालाच खरे आंतरिक प्रेम म्हणता येईल. परंतु आजकालच्या पिढीमध्ये या आंतरिक प्रेमाची वाणवा असल्याची जाणीव होते.

हल्लीच्या तरूण पिढीची प्रेमाची भाषा व त्याचे तंत्र वेगळेच वाटते. केवळ प्रथम भेटी मध्ये झालेली नजरानजर, त्यानंतर एकाद दूसरी कोठे तरी, कशी तरी झालेली भेट यातच त्यांच्या प्रेम भावना उफाळून येतात व प्रेम जमते. अशा प्रेमाला शरीराच्या बाह्यरूपावर भाळून झालेले वरपांगी प्रेम म्हटले तर वावगे ठरू नये. प्रेमसंबंध वाढण्यापुर्वी अथवा वाढविण्यापुर्वी किमान समोरच्या व्यक्तिची मानसिक, बौध्दिक, वैचारिक, कौटुंबिक इ.परिस्थिती तसेच त्याचे विचार, आचार लक्षात घेणे फार गरजेचे आहे. अशा प्रेमात आंधळे झालेले प्रेमांध प्रेमी, समाजात वावरतांना रस्त्यावर, बागेमध्ये अथवा सार्वजनिक ठिकाणी विनासंकोच मुक्त प्रेमाराधना करित असल्याचे सर्रास दिसते. आपण सार्वजनिक ठिकाणी आहोत. आपल्या कडे अन्य कोणाचे लक्ष आहे याची त्यांना भ्रांत नसते. अशा बेजबाबदार वर्तणुकिमुळेच बलात्कारासारख्या घटनांना खत पाणी मिळते. यांच्या अशा वर्तणुकिची घरी पालकांना कल्पना असतेच असे नाही. यांच्यावर कोणाचा धरबंधपण नसतो. यदाकदाचित कोणी समंजस सामान्य व्यक्तिने समजाविण्याचा प्रयत्न केल्यास "आम्हाला अडविणारे तुम्ही कोण ?" असा प्रतिप्रश्न करून समजाविणा–याची बोलती बंद केली जाते. प्रेमात विवाहाच्या आणाभाका घेतल्या जातात. आणा भाका घेण्यापुर्वी आपली कौटुंबिक परिस्थिती, आपले कुटुंब, आपले पालक, त्यांच्या आपल्या विषयी आशा आकांक्षा, तसेच ज्यांच्या समवेत आपण गेली २०–२५ वर्षे घालविली त्यांचा जरा देखिल विचार केला जात नाही. सहाजिकच मनाचा मोठेपणा दाखवित व पाल्यांच्या हट्टापायी व आनंदाखातर नाईलाजास्तव पालक प्रेमविवाहास परवानगी देतात.

याशिवाय हल्लीच्या तरूण पिढीमध्ये पाश्चिमात्य देशाचे अनुकरण करण्याकडे कल वाढलेला दिसतो. आपण भारतीय आहोत, आपली भारतीय संस्कृती थोर आहे या विचारांना तिलांजली देत लिव्ह इन रिलेशनशिप सारख्या पाश्चिमात्य गोष्टीचे अनुकरण केले जाते. याचे परिणाम पण दिसून येतात. तात्पर्य प्रेम करतांना अथवा लिव्ह इन रिलेशनशिप सारख्या पाश्चिमात्य गोष्टीचे अनुकरण करतांना तरूण तरूणींनी सारासार विचार करावा व पुढचे पाउल टाकावे. हिच प्रमाणिक अपेक्षा. यापुढे अजून कोणाची फसवणूक होउन कोणी बळीचा बकरा बनू नये म्हणून हा पत्र प्रपंच.